# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 10/08/2020 (सोमवार)
(दुपार)

---

### दुखापत

1) पो.स्टे. कळमेश्वरः– अंतर्गत 16 कि. मी अंतरावर मौजा कोतवाल बर्डी येथे दिनांक 09/08/2020 चे 08:00 वा.ते 08.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मोहनसिंग बाबा, वय 70 वर्ष, रा. ग्वालीयर ह.मु. कोतवाल बर्डी डॉ प्रविण घंटावार यांचे शेतात राहत असुन तो दुध घेण्याकरिता बाजुच्या शेतात गेला होता. त्यादरम्यान आरोपी क्र. 1) गणेश ईरखेडे व 2) प्रभाकर बेलेकर दोन्ही रा. कोतवाल बर्डी यांनी संगनमत करून अज्ञात कारणावरून फिर्यादीला हातबुक्कीने व काठीने डाव्या भागाच्या डोक्यावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीतांविरुध्द कलम 324, 504, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार सुनिल कामडी 992312397 हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापा :– अंतर्गत 9 कि. मी अंतरावर मौजा निमतलाई येथे दिनांक 09/08/2020 चे 18:00 वा. दरम्यान आरोपी पती नामे– कृष्णाजी वसंतराव गजभिये, वय 38 वर्ष, रा. निमतलाई याने त्याची पत्नी फिर्यादी नामे– सौ प्रभा कृष्णाजी गजभिये, वय 32 वर्ष, रा. निमतलाई हिला ''तु तुझ्या वडीलाकडुन शेती विक्रीचे पैसे आणले नाही, ते घेउन ये'' असे म्हणुन आरोपीने तिला शिविगाळ करून तिचे केस पकडुन डोके खिडकिवर आपटुन जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार ठाकरे 9923908382 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर